

# मराठी (प्रथम भाषा) लेख- २०

**आसावरी सुर्वे, शाळा :** विद्या मंदिर, दहिसर

## बोर्ड परीक्षा नमुना उत्तरपत्रिका(क्रमशः)

**प्रश्न ४ (क) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा**

**१)** 'उद्योगास झटणे हाच शहाणपणा आहे.'

**संदर्भ-** 'ज्ञान हाच पराक्रम' हा लोकहितावादी यांचा विचारप्रधान लेख आहे. वरील वाक्य उद्यमशीलतेचे महत्त्व सांगणारे आहे. देशाच्या विकासाचे व्यापार आणि उद्योग हेच योग्य साधन आहे.

**स्पष्टीकरण-** इंग्रजांमुळे भारतीयांना दुःख, दैन्य आले, असे लोकांना वाटते. इंग्रज जातील तेव्हाच सारे दारिद्र्य नष्ट होईल. इंग्रज जाण्यासाठी भारतीयांनी देशास व्यापार, उद्योगाने समर्थ करावे, ज्ञान घ्यावे, शिक्षण घ्यावे, कष्ट करावेत. दैन्य दूर करण्यासाठी उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात करावेत. कौशल्य संपादन करावे.

**भाषाविशेष-** १) लोकहितवादी देशाच्या विकासाचे मर्म सांगतात. २) इंग्रजांना परतून लावण्यासाठी भारतीयांना सक्षम होण्याचा मंत्र देतात. ३) देशकार्यास प्रवृत्त करतात.

**(ख) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

**२)** 'वाहताना भार त्यांचा जाहले गणगोत त्यांचे कोणते नाते कळेना बांधले आयुष्यभरचे'

**संदर्भ-** कवी ना. धों. महानोर यांच्या 'दीप लावू' या कवितेतील ओळी आहेत. मानवतेचे समर्थन करणारे हे विचार आहेत. दुःखितांना मदत करणारे हात, त्यांचा आधार बनतात. हाती हात घेऊन आयुष्यभरचा सहप्रवास करतात.

**स्पष्टीकरण-** समाजातील उपेक्षितांचे दुःख, समाजातील मोडलेल्या माणसांचे दुःख परोपकारी माणसांना मानव्याची साद देतात. आपल्याजवळ आणतात. पुढे त्यांचे आप्तस्वकीय होऊन जातात. मानवतेच्या नात्याने आयुष्यभर एकत्र राहतात. ही विशाल आशा व्यक्त करणारी ही काव्यपंक्ती आहे.

**भाषा विशेष-** १) समाजातील परोपकारी माणसांची भाववृत्ती स्पष्ट केली आहे.२) मानवतेची उदात्त भावना व्यक्त करणारी अर्थपूर्ण काव्यपंक्ती आहे.

**प्र. ५ : खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ५० ते ६० शब्दांत लिहा.**

**१) - आबाच्या मनाला कोणत्या कारणामुळे घोर लागला होता ?**

**उत्तर -** 'घोर' ही ग्रामीण कथा आहे. शेतकऱ्याच्या समस्यांना वाचा फोडणारी आणि वेदनेचे आर्त पुकारणारी. ही कथालेखक रवींद्र शोभणे यांची आहे. आबा हे अल्पभूधारक शेतकरी आहेत. त्यांच्या शेतीच्या उत्पन्नाचा विचार करता कष्टाइतके पिकाचेही दान त्याच्या पदरी पडत नाही. एकुलत्या एक मुलीचे लग्न करणे ही पित्याच्या मनाला भेडसावणारी काळजी त्यांनाही आहे. आपले वावर विकून लेकीचे लग्न करावे असे आबाने ठरविले आहे.

गावाच्या सुधारणेसाठी सरकार रस्तेबांधणीची योजना आखते. त्या वेळी आबाचे शेत सडकेत जाणार होते. आजूबाजूची जागाही वाचलीच तर ती खणतीत जाणार होती. त्यामुळे आबा शेत विकण्यास असमर्थ होता.

पैसा उभा करण्यासाठी 'शेत विकणे' हाच एक मार्ग असतानाही तो शेत विकू शकत नव्हता. त्यामुळे त्याच्या मुलीच्या लग्नाला पैसा मिळणे शक्य होत नव्हते. ही धक्कादायक काळजी नव्हे हाच त्याच्या मनाला घोर होता. आबाची विकल अवस्था कृषिप्रधान देशात केवळ दुःखच देते.

**२)-'पारंब्या' या पाठातील रूपक स्पष्ट करा.**

**उत्तर -** 'पारंब्या' ही शांतिलाल भंडारी यांची रूपककथा आहे. रूपककथा आशयप्रधान असते. आशयामुळे ती परिणामकारक ठरते. कल्पकतेची तिला जोड असते. 'पारंब्या' ही कथा निसर्गप्रतिमांच्या माध्यमातून मानवी जीवनातील प्रवृत्तींवर भाष्य करते.

वड आणि आंबा शेजारीशेजारी वाढलेली दोन झाडे. पण त्यांचे एकमेकांशी बिनसलेले आहे. कारण वड सपुत्र होता आणि आंबा निपुत्र होता. वडाच्या पारंब्या पाहून आंब्याला कसेसेच होई. अर्थात आंब्याला वडाचा मत्सर वाटू लागला.

या कथेत आंबा व वड हे मानवी स्वभावाचे प्रतीक आहेत. समाजामध्ये काही माणसांना सारे सुख मिळते, काहींना मिळत नाही. ज्यांच्याजवळ एखाद्या गोष्टीची कमतरता असते ती मानवी स्वभावानुसार दुसऱ्याचा मत्सर करतात, हेवा करतात; परंतु तसे न करता आपल्याजवळ जे आहे त्यातच समाधानी राहावे. ज्यांच्याजवळ खूप काही आहे त्यांनी उदार राहून दुसऱ्यांना दान करीत राहावे. मानवी जीवनाच्या सुखाचा हाच मूलमंत्र आहे, हे विचार या पाठातील रूपकातून स्पष्ट होतात.

**प्र. ६ वा : खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा.**

**'हुंडा- एक अनिष्ट प्रथा'**

अमृताच्या दिमाखदार लग्नसोहळ्याची मी साक्षीदार! लग्नात सारे मानपान अगदी मनाजोगते झाले. थाटमाट सगळंच शानदार, झोकात वऱ्हाडीमंडळी निघाली, स्वप्नवेल फुलवीत अमृताही उंबरठ्यावरचं माप ओलांडून घरी आली. बघता बघता हळद उतरली. मेंदीचा रंग विटला, अमृताचे हात राबू लागले. सासरच्या नजरा तिला भेडसावू लागल्या. हुंडा न घेता अमेयने लग्न केले होते. अमृताच्या माहेरकडून काही फारसं दिलं नाही. मग घरातून टोमणे, मनाला दुखविणारे शब्द, पदोपदी अपमान, सगळं सुरू झालं. हुंदका आवरीत ती वावरू लागली. प्रकाशाला सामोरी जात असतानाच एका अंधाऱ्या आयुष्याची सोबत मिळाली.

एकविसाव्या शतकात प्रगतीचे क्षितिज उजळले असतानाही अशी अमृता भेटते आणि साऱ्या ऋतूंची सांगता होते.

''स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी
हृदयी अमृत नयनी पाणी''

पुरुषप्रधान संस्कृतीची मानसिकता म्हणावी? रूढी, परंपरा यांना सन्मान देणारी मूक अगतिकता म्हणावी? खरंच, लग्न म्हणजे एक व्यवहार ठरतो. हुंड्याचा एका करार! वरपक्षाची ती प्रतिष्ठा ठरते. रूढी आणि परंपरेच्या जोखडाखाली स्त्रिया भरडल्या जातात. १९६१ च्या हुंडाविरोधी कायद्यानेही ही अनिष्ट प्रथा बंद झालेली नाही. किंबहुना या कायद्याचा आधार घेणारी निर्भय स्त्री आज दिसत नाही. कुलशील, मर्यादा सांभाळून ती समर्पित जीवन जगते.

'स्त्री-पुरुष समानता' हा विचार अनादि काळापासून रुजलेला आहे. संत ज्ञानेश्वर आपल्या 'अमृतानुभवा'त ही पुरोगामी दृष्टी देतात. स्त्री-पुरुष समान आहेत. हा हक्क असूनही मात्र स्त्री मूकपणे आपले जगणे, मनानेही आणि लाक्षणिक अर्थानेही क्लेशदायक पद्धतीने स्वीकारत असते.

लग्नाच्या व्यवहारात हुंड्याला महत्त्व दिले जाते. वस्तुतः लग्न म्हणजे मनोमीलन! एक पवित्र नाते! संपूर्ण कुटुंब व्यवस्थेचा तो कणा आहे. असे असताना हुंडा नामक राक्षसी वृत्तीला नष्ट करणे आवश्यक आहे. अजूनही याबाबत लोकशिक्षण होणे गरजेचे आहे. स्त्री-मुक्ती संघटना कार्यक्षम असूनही ग्रामीण भागात याचा फायदा मिळत नाही. हुंड्यामुळे आत्महत्या होतात अशा बातम्या वृत्तपत्रात वाचावयास मिळतात. हुंडा कमी दिला म्हणून सासरचे सुनेला जाळतात अशा बातम्यांनी मनाला यातना होतात. या अन्यायाविरुद्ध झुंज देणे आवश्यक आहे. महात्मा फुले, आगरकर, कर्वे यांना स्त्री-शिक्षणास महत्त्व दिले म्हणून आजची स्त्री समर्थ आहे. तिची अस्मिता जागी आहे. तिची आत्मप्रतिष्ठा जागी आहे. तिला स्त्रीत्वाची जाणीव आहे. अशी खंबीर भूमिका घेऊनच हुंडा ही अनिष्ट प्रथा मोडली पाहिजे. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' हा शांततेचा मूलमंत्र आहे.

**उद्याचा विषय :**(क्रमशः)

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com